## आदेश

पोआ/११(६)/गणेश चतुर्थी/१६३/२०२४

ज्याअर्थी, **दि. ०८, ११, १२, १३, १७ सप्टेंबर २०२४** रोजी गणपती आणि गौरी मुर्तींचे पाण्यात विसर्जन केले जाते.

ज्याअर्थी, काही अर्ध्या विरघळलेल्या मुर्ती भरतीच्या वेळी किनाऱ्यावर वाहून जातात किंवा तलावाच्या पाण्यावर तरंगतात.

ज्याअर्थी, काही लोक तरंगणाऱ्या अशा मुर्तींचे फोटो घेतात तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी मुर्ती गोळा करतानांचे फोटो घेतात आणि धार्मिक भावना दुखावतील आणि सार्वजनिक शांतता आणि भावना भंग पावतील अशी छायाचित्रे प्रकाशित/प्रसारित करतात.

ज्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत माझे मत आहे की, विसर्जनानंतर अशी छायाचित्रे काढणे, प्रकाशित करणे आणि प्रसारित करणे प्रतिबंधित करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि कलम १६३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये त्वरीत प्रतिबंधासाठी जलद उपाय करणे इष्ट असलेने ते त्वरीत प्रतिबंधित करण्यासाठी माझ्याकडे पुरेसे कारण आहे.

त्याअर्थी, मी, **अकबर पठाण, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई** तथा कार्यकारी दंडाधिकारी कलम १६३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये विशेष अधिकार दिलेले आहेत, याद्वारे आदेश देतो की, कोणत्याही व्यक्तीने विसर्जनानंतर तरंगत्या मुर्तीचे किंवा अर्धवट तरंगत्या मुर्तीचे फोटो काढू नयेत आणि ते प्रकाशित किंवा प्रसारित करू नये.

हा आदेश ०८ सप्टेंबर २०२४ ते १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत बृहन्मुंबईमध्ये लागू राहील.

या आदेशाचे उल्लघंन करणारी कोणत्याही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत दंडनीय असेल.

मी पुढे असे निर्देश देतो की, हा आदेश सार्वजनिक ठिकाणी त्याच्या प्रती चिकटवून, स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन आणि बृहन्मुंबईत लाऊडस्पीकरद्वारे त्याची घोषणा करून प्रसिध्द केला जाईल.

**सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ०२** सप्टेंबर २०२४ रोजी दिला आहे.

**पोलीस आयुक्त,**
**बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

Deputy Commissioner of Police (Operations)
Brihan Mumbai

( **अकबर पठाण** )
पोलीस उप आयुक्त, (अभियान),
तथा कर्यकारी दंडाधिकारी
बृहन्मुंबई

Scanned with CamScanner

# ORDER

**CP/XI(6)/Ganesh chaturthi/163/2024.**

WHEREAS, Ganpati and Gauri idols are immersed in waters on **08th, 11th, 12th, 13th, 17th, September 2024.**

AND WHEREAS, some of the half dissolved/idols drift ashore during high tide or float in lake water,

AND WHEREAS, some people take the photographs of such idols lying ashore or being taken by Brihanmumbai Municipal Corporation workers for reimmersion and publish/circulate such photographs which may likely to outrage religious feelings may result in to disturbance of public peace and tranquility,

AND WHEREAS, in the aforesaid circumstances, I am satisfied that immediate measures are necessary to prohibit taking, publishing and circulating such photographs after immersion and further satisfied that there is sufficient ground for me to prohibit it under section 163 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 for immediate prevention as speedy remedy.

NOW, THEREFORE, **I, Akbar Pathan, Dy. Commissioner of Police (Operations), Brihanmumbai and Executive Magistrate** specially empowered under section 163 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 in exercise of the said powers do hereby order that no person shall take photographs of idols floating or half-submerged after the immersion and shall not publish the same or circulate it.

This order shall remain effective throughout Brihanmumbai from **08th September 2024 to 18th September 2024.**

Any violation of this order is punishable u/s 223 of Bharatiya Nyaya Sanhita, 2023

I further direct that this order shall be published and promulgated in Brihanmumbai by affixing copies thereof in conspicuous public places, by advertising the same in local newspapers and by proclaiming the same through loudspeakers in Brihanmumbai.

Given under my hand and seal this 02nd September, 2024.

Office of the
Commissioner of Police,
Brihanmumbai.

Deputy Commissioner of Police (Operations)
Brihan Mumbai

02-09

( Akbar Pathan )
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate
Greater Mumbai.

Scanned with CamScanner